पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड.
स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ, प्रेमलोक पार्क,
चिंचवड -४११ ०३३
फोन नं. २७३५०५५५

जा.क्र. पोआपिंचि/आस्था-२ /पो. भ. २०१९/ ८००१ /२०२१ पिंपरी चिंचवड दिनांक १५ /११/२०२१

# प्रेसनोट

पिंपरी चिंचवड पोलीस दलाच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या ७२० पोलीस शिपाई पदांसाठी पोलीस भरती २०१९ लेखी परीक्षेकरिता एकुण १,८९,७३२उमेदवारांचे आवेदन अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर उमेदवारांची लेखी परीक्षा दि. १९/११/२०२१ रोजी दुपारी ३:०० ते ४:३० या वेळेत पिंपरी चिंचवड, पुणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, सोलापूर, नागपुर इत्यादी शहरातील ४४४ विविध परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. सदर ४४४ परीक्षा केंद्रांवरील एकुण ७३८४ परीक्षा हॉलमध्ये उमेदवारांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. सदर लेखी परीक्षेसाठी एकुण १२६९६ पोलीस अधिकारी व अंमलदार (अपोअ ०१, पोउपआ १५, सपोआ २५, पोनि १७७, सपोनि/ पोउपनि ६३६, पो.अंमलदार ११८३८) यांचा बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

परीक्षेकरिता येणाऱ्या उमेदवारांनी "काय करायला पाहिजे" अथवा "काय करायला नको" याबाबत खालील नमूद सुचना उमेदवारांना देण्यात आलेल्या आहेत.

**<u>उमेदवारांसाठी सुचना :-</u>**

१. प्रवेश पत्रावर नमूद केलेप्रमाणे कोव्हीड-१९ साठी खबरदारी म्हणून उमेदवारांनी परीक्षा केंद्रात दिलेल्या वेळेत प्रवेश करावा.

२. उमेदवारांनी परीक्षा केंद्रात प्रवेश करतेवेळी परिधान केलेल्या पोषाखामध्ये हाफ बाहयाचा शर्ट/टि शर्ट/टॉप परिधान करणे उचित राहील.

३. परीक्षा हॉलमध्ये प्रवेश करण्यापूर्वी उमेदवारांनी चप्पल/बूट/सँडल हॉल बाहेर काढावेत.

४. परीक्षा केंद्रात प्रवेश करीत असताना उमेदवार यांनी त्यांच्याकडे असलेली इलेक्ट्रॉनिक उपकरणे/ मोबाईल ।स्मार्ट वॉच/ब्लुटूथ उपकरणे अशा प्रकारच्या परिक्षा केंद्रात नेण्यास प्रतिबंध आहे.

५. परीक्षा केंद्रात प्रवेश करण्याची वेळ संपल्यानंतर परिक्षा केंद्रात उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

६. कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी स्वयं घोषणापत्र / वचनपत्र स्वहस्ताक्षरात लिहून द्यावे.

७. परीक्षेची पध्दत ओएमआरवर आधारीत असलेने योग्य पर्यायाचे वर्तुळ गडद करावे.

८. परीक्षेची वेळ संपल्यानंतर, पर्यवेक्षकानी सांगितल्यानंतरच उमेदवाराने जागा सोडावी.

९. उमेदवारांनी प्रवेशपत्रा बरोबरच शासनाने अदा केलेले वैध ओळखपत्राचा (फोटो आय. डी.) पुरावा (आधार कार्ड/पॅन कार्ड/ड्रायव्हींग लायसेन्स/मतदान ओळखपत्र/पासपोर्ट) सोबत आणले पाहिजे.

१०. उमेदवारांनी साधे निळे/काळे बॉलपॉईंट पेन आणले पाहिजेत.

११. परीक्षा संपल्यानंतर सर्व उमेदवारांनी प्रवेश पत्र पर्यवेक्षकांकडे परत करावेत.

१२. जाहिरातीमधील महत्वाच्या सुचना व अटिंच्या अनुषंगाने उमेदवार यांनी चुकीचा निवडलेला पर्यायानुसार त्यामध्ये सुधारणा करता येणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

**(कृष्ण प्रकाश)**
**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.**